# अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदासाठी जाहिरात

## कार्यालय-बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी) नागपूर शहर पश्चिम

महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबाविं-2022/प्र.क्र.94/का.6 मंत्रालय मुंबई दिनांक 30/01/2025 च्या अनुषंगाने बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी) नागपूर शहर पश्चिम या प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडी केंद्रासाठी रिक्त मदतनीस यांची मानधनी पदे भरती करावयाची आहेत.

प्रकल्पाअंतर्गत खालील प्रमाणे नमुद क्षेत्रातील रहिवासी महिला उमेदवारां कडून अर्ज मागविण्यात येत आहेत. नागपूर महानगरपालीका क्षेत्राअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी) शहर पश्चिम या प्रकल्पक्षेत्रा बाहेर राहणाऱ्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

MySarkariNaukri.Com

### मदतनीस रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र. | पदाचे नांव | रिक्त पदांची संख्या. |
|---|---|---|
| 1 | अंगणवाडी मदतनीस | 8 |
| | एकूण- | 8 |

### पात्रतेचे निकष

| तपशील | अंगणवाडी मदतनीस |
|---|---|
| शैक्षणिक पात्रता | किमान 12 वी पास किंवा अधिक |
| वयोमर्यादा | 18 ते 35 वर्षे (विधवा उमेदवारासाठी कमाल 40 वर्ष) |
| एकत्रित मानधन | दर महा रुपये 7,500/- (शासन नियमा प्रमाणे वाढ अनुज्ञेय राहील) |

अर्ज मिळण्याचे व जमा करण्याचे ठिकाण कार्यालय-बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी) नागपूर शहर पश्चिम कार्यालयाचा पत्ता :- श्री. ज्ञानेश्वर बालपांडे यांची ईमारत, प्लॉट नंबर-97, हनूमान नगर, बँक ऑफ महाराष्ट्राच्या मागे, नागपूर दुरध्वनी क्रमांक :- (0712) 2750039

**अटी व शर्ती :-**

1. अर्जदार हा नागपूर महानगरपालीका क्षेत्राअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी) नागपूर शहर पश्चिम या क्षेत्रातील रहिवासी असणे अनिवार्य आहे. प्रकल्प कार्यक्षेत्रा बाहेरील अर्जाचा विचार केला जाणार नाही.
2. अर्जासोबत सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती तसेच लहान कुटूंबा बाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे अत्यावश्यक आहे.
3. विधवा व अनाथ उमेदवार असल्यास उमेदवाराने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र/दाखला अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.
4. सविस्तर अटी व शर्ती अर्जासोबत कार्यालयात उपलब्ध आहेत. त्यानुसारच अर्ज सादर करावेत.
5. नेमणुकी संदर्भात अंतिम निर्णय बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नागपूर शहर पश्चिम यांची राहील.
6. मुदतीनंतर व्यक्तिशः व टपालाने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
7. अर्जाचा नमुना कार्यालयात विनामुल्य उपलब्ध आहे. तसेच कार्यालयाबाहेरील अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.
8. जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे आणि विधवा उमेदवारासाठी वयोमर्यादा कमाल 40 वर्षे राहिल. वयाचा पुरावा म्हणून टि.सी./बोर्ड प्रमाणपत्र/जन्म दाखला जोडवा.
10. जाहीरात प्रसिध्द दिनांकांपासून अर्ज स्विकारण्याची मुदत शासकीय सुटटीचे दिवस वगळता 10 दिवसाची राहील. तसेच शेवटच्या दिवशी दिनांक 18/02/2025 रोजी सांयकाळी 6.00 वाजल्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.
11. जाहिरात कोणत्याही टप्यावर रदद करणे किंवा पदसंख्येत बदल करणे याबाबत अंतीम अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नागपूर शहर पश्चिम यांचा राहील.

स्वा/-
(डि. एच. कुंभरे)
बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)
नागपूर शहर पश्चिम

क्र.संमावज/नाग./732/2025